( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता )

क्र.पोमसं/३/१०/६/सार्वत्रिक बदल्या-१८/११/२०१८
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय**
शहीद भगत सिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१.
दिनांक.- २७/०३/२०१८.

## आदेश

मा. उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील निःशस्त्र पोलीस निरीक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत निर्देश दिले आहेत. तसेच, अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथील रिक्त पदे भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यास अनुसरुन महासंचालक (अतिरीक्त कार्यभार), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.अॅकब्यु/आ-२/लाप्रवि पद भरणेबाबत/२०१८/३०७३, दिनांक २६/०३/२०१८ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे कर्तव्य करण्यास इच्छुक असणाऱ्या ०६ निःशस्त्र पोलीस निरीक्षकांची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे नेमणूक करण्याबाबत शिफारस केली आहे.

महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१, कलम-२२ न (२) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी उपरोक्त सर्व परिस्थितीचा विचार करुन अपवादात्मक परिस्थीतीत व विशेष बाब म्हणून खालील ०६ निःशस्त्र पोलीस निरीक्षकांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणाहून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकाचे नाव | सध्याची नेमणूक | पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांचे आदेश |
|---|---|---|---|
| १. | रविंद्र शिवाजी राऊळ | नागपूर शहर | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |
| २. | रविंद्र भारत थोरात | नागपूर शहर | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |
| ३. | रामकृष्ण नामदेवराव मळघणे | वाशिम | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |
| ४. | गजानन लक्ष्मण पडघण | अकोला | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |
| ५. | नंदकिशोर मनोहर पंत | यवतमाळ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |
| ६. | विजय नागोराव डोंगरे | नांदेड | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग |

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त, नागपूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती / नांदेड परिक्षेत्र, नांदेड.
पोलीस अधीक्षक, वाशिम / अकोला / यवतमाळ / नांदेड.

२. उपरोक्त घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त केल्याचा व त्यांचा हजर झाल्याचा दिनांक ह्या कार्यालयास सत्वर कळवावा.

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव, गृहविभाग,
महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यासन अधिकारी, का.क्र.९, ३६ व ४० (पोमसं कार्यालय).